# भारतीय लष्करात कॅप्टन म्हणून सेवा केलेल्या ज्येष्ठाचा खुन करणाऱ्याला, युनिट-३,गुन्हेशाखेकडून १० दिवसात अटक

भारतीय लष्करात कॅप्टन म्हणून सेवा केलेल्या आणि कौटूंबीक कारणामुळे पदपथावर दिवस जगण्याची वेळ आलेल्या ज्येष्ठ रवीद्रकुमार बाली वय ६५ वर्ष रा. कोयाजी रस्ता, मुळ राजस्थान यांचा खुन दिनांक ०१.०२.२०१८ रोजी रात्री ११.४५ वा.चे सुमारास दुचाकीवरून आलेल्या इसमांनी डोक्यात सिमेंट ब्लॉक घालून, जिवे ठार मारून कोणताही पुरावा न मागे ठेवता पसार झाले होते.

मा. पोलीस आयुक्त, यांच्या सुचनांप्रमाणे व वरीष्ठांचे मार्गदर्शनाप्रमाणे अज्ञात गुन्हेगारांना पकडण्यासाठी श्री. सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे शाखा युनिट-३ कडील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या होत्या.

सुचनाप्रमाणे लष्कर भागातील सी.सी.टी.व्ही फुटेजची पडताळणी केली असता एक संशयीत घटनास्थळापासुन मंगल विहार, वंडरलँन्डच्या बोळातुन एम.जी रोड त्यानंतर टोराटोरा हॉटेलच्या शेजारील बोळातुन - ताबुत स्ट्रिट - नाझ चौकातुन, हॉटेल अरोरा टॉवर या ठिकाणाहून पळत पळत जात असल्याचे निष्पन्न झाले व नमुद अनोळखी संशयीत इसमानेच गुन्हा केला असल्याची शक्यता धरून त्याअनुषंगाने तपास करीत असताना दाखल गुन्हा हा रॉबीनसन ऊर्फ रॉबीन ॲन्थोनी लाझरस रा. ३,कलनल, तारापुर रोड, दस्तुर बॉयज हायस्कुल समोर पुणे याने केला असून तो गुन्हा झाल्यापासून फरार झाला असल्याची माहीती मिळाली.

नमुद संशयीत आरोपीचा तपास करीत असताना, श्री. सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांना माहीती मिळाली की, आरोपी रॉबीन हा पेंदर,तळोजा,ता.पनवेल जिल्हा रायगड येथे आहे. त्याभागात जावून तपास करता रॉबीनसन ऊर्फ रॉबीन ॲन्थोनी लाझरस वय २१ हा मिळून आला. त्याचेकडे दाखल गुन्ह्यासंदर्भाने तपास करता, त्याने दाखल गुन्हा केला असल्याचे कबुल केले. गुन्ह्याबाबत अधिक तपास करता, त्याने सांगीतले की,

रॉबीन व त्याचा मित्र कुणाल मोरे हे संध्याकाळी केदारी पेट्रोल पंपाजवळून दारू घेवून ओल्ड नाईन्टी नाईन जवळील टेकडीवर दारू पित बसले. तेंव्हा त्यांचे मित्र अक्षय कांबळे, तेजस मोरे, राज कांबळे असे तिघेजण त्यांचे जवळ आले. सर्व जण दारू पिवून झाल्यानंतर घरी जाण्यासाठी निघाले असता, आरोपीची गाडी बंद पडली म्हणून कुणाल मोरे याने त्याचा भाऊ तेजस मोरे याला त्याची गाडी घेवून बोलावले. त्याप्रमाणे तेजस गाडी घेवून आल्यानंतर तेजसच्या गाडीवर तिघेजण व कुणाल मारे व मी कुणाल याची निळ्या रंगाची ॲक्टीवा गाडी नंबर एम.एच.१२-केएल-२५७६ हिचेवर बसून महंमदवाडी येथून निघून आरोपीचे

घरी येत असताना, रात्री ११.३० वा. त्यांची गाडी मंमादेवी चौकात पेट्रोल संपल्याने बंद पडल्याने, गाडीस कुणाल हा धक्का मारत व आरोपी स्वतः पाठीमागून चालत घराकडे जात होते. त्यावेळेस रॉबीन यास सिगारेट ओढायची असल्याने, डॉक्टर कोयाजी रोडवरील बंगला नं ७ चे समोरील फुटपाथवरील असणाऱ्या टेंन्टमध्ये झोपलेल्या मयत रवीद्रकुमार बाली यांना उठवले व माचिस पाहीजे असे सांगीतले. रवीद्रकुमार बाली यांनी माचिस दिली नाही. तेंव्हा बाली व आरोपी रॉबीन यांच्यात झटापट होवून मारामारी झाली, दोघात तेथे भांडणे झाली. व त्या भांडणामध्ये रॉबीन याने रस्त्याचे जवळच असणारा सिमेंटचा ब्लॉक उचलुन त्याचे डोक्यात दोन-तिन वेळा मारला. व ते जागेवर खाली कोसळला तेंव्हा कुणाल मोरे आरोपीस म्हणाला की, पथ्तर से मत मारो, झगडा मत करो, लफडा हो जाएगा, असे म्हणून कुणाल गाडी घेवून सरळ पळत गेला व मी त्यानंतर आरोपीने त्यास कोणीही ओळखू नये म्हणून स्वतःचे केस महंमदवाडी येथे कापून केश रचना बदलली. तसेच मित्रांकडून स्वतःच्या घरातील कपडे आणून कोणांस काही कळू नये म्हणून मुंबई येथे जावून पेंदर,तळोजा,ता.पनवेल जिल्हा रायगड येथे चायनीज गाडीवर काम करू लागला होता.

वरील कामगिरी गुन्हे शाखचे श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त-१. यांचे मार्गदर्शना खाली युनिट ३ गुन्हे शाखा चे सिताराम मोरे, श्री शकुर सय्यद, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस निरीक्षक, अतुल साठे, संदीप तळेकर, राजु रासगे, रोहीदास लवांडे, महेंद्र पवार, गजानन गाणबोटे, शिवानंद स्वामी, संदीप राठोड, मपोशि कल्याणी आगलावे गुणशिलन रंगम, अनिल घाडगे, अनिल भोसले, कल्पेश बनसोडे यांनी केली आहे.


पुणे शहर पोलीस